# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र ९९** **दिनांक- १४/०४/२०२१**

## बनावट पासपोर्ट बनवून बेकायदेशीररीत्या भारत देशात राहणारे नायजेरीयन आरोपीत नालासोपारा पोलीसांकडून जेरबंद.

---

नालासोपारा विभागात तसेच नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीत परकीय नागरीकांचे बेकायदेशीर राहण्याचे वाढते प्रमाणाचे गांभीर्य लक्षात घेवून श्री संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, मिरा भाईंदर वसई विरार आयुक्तालय, परीमंडळ-२, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री चंद्रकांत जाधव, नालासोपारा विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री वसंत लब्दे, नालासोपारा पोलीस ठाणे व नालासोपारा पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांनी दि.०५/०३/२०२१ रोजी नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीतील हनुमाननगर परिसरात कोम्बींग ऑपरेशन राबविले होते.

सदर कोम्बींग ऑपरेशन दरम्यान रुम नं. बी/१०५, गॅलेक्सी अपामेंट. हनुमाननगर, नालासोपारा प. येथे परकिय नागरिक नामे Mr JACKSON PETER OBODO वय-३५ वर्षे मुळ देश- नायजेरिया, मो.नं. ८०९७६९२७३५ व रुम नं. १०४, साहील अपार्टमेंट. हनुमाननगर नालासोपारा प. येथे परकिय नागरिक नामे Mr. ODEH CHIBUZO THADDEUS वय-३९ वर्षे मुळ देश- नायजेरिया, मो.नं. ९८६७०२५५६० असे इसम मिळुन आले होते. त्यांना त्यांचे पासपोर्ट बाबत विचारणा करता त्यांनी नायजेरीया देशाचे पासपोर्ट समक्ष हजर केले.

नमुद इसमांचे व्हिसाची मुदत संपल्याचे निदर्शनास आले होते. तसेच सदर दोन्ही इसमांचे पासपोर्टची पडताळणी करणे आवश्यक असल्याने ते रितसर पंचनामा करुन पासपोर्ट पडताळणीकामी ताब्यात घेतल होते. सदर पासपोर्ट व व्हिसाची मा.इमीग्रेशन ऑफिसर, छत्रपती शिवाजी महाराज अंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई या ठिकाणी पत्र व्यवहार करुन नमुद इसमांचे पासपोर्ट वैध आहेत अगर कसे? याबाबत माहिती मागीतली होती. तसेच अरायवल डिपार्टमेंट येथे फोन करुन नमुद इसमांचे आगमनाची नोंद आहे अगर कसे? या बाबत विचारपुस केली असता तेथील जाणकार तज्ञ अधिकाऱ्यांनी नमुद इसमांचे पासपोर्ट व व्हिसाची प्राथमिक पाहणी करुन सदरचे पासपोर्ट व व्हिसा हे बनावट असल्याचे सांगितले. त्यानंतर नमुद इसमांना त्यांच्याकडील वैध पासपोर्ट, व्हिसा व त्यांसंबंधीचे तत्सम कागदपत्रे सादर करणेसाठी दिनांक १२/०४/२०२१ रोजीपावेतो वेळ दिला होता परंतू त्यांनी कोणत्याही प्रकारची पुराव्याची कागदपत्रे हजर केलेली नाहीत.

Scanned with CamScanner

दि.०५/०३/२०२१ रोजी सकाळी ०६.३० वा. व त्यापुर्वीपासुन इसम नामे १)Mr JACKSON PETER OBODO वय-३५ वर्षे रा.रुम नं. बी/१०५, गॅलेक्सी अपार्टमेंट हनुमाननगर, नालासोपारा प. व २)Mr. ODEH CHIBUZO THADDEUS वय-३९ रा.रुम नं. १०४, साहील अपार्टमेंट हनुमाननगर नालासोपारा प. हे नायजेरिया देशाचे रहीवासी असुन त्यांनी मुळ पासपोर्ट व व्हिसा हजर केलेले नाहीत तसेच सदर इसम हे बनावट पासपोर्ट बनवुन भारत देशात बेकायदेशीर अनाधिकृतरित्या वास्तव्य करत असताना मिळुन आले आहेत. त्यांचेविरुध्द नालासोपारा पोलीस ठाणे गुरनं I १८८/२०२१, भा.दं.वि.सं.कलम ४६५, ४६८, ४७१, ४२० सह परकिय नागरी कायदा १९४६ चे कलम १४ सह पारपत्र अधिनियमचे कलम १२ (क) प्रमाणे गुन्हा दाखल करुन आरोपीत यांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाची फिर्याद नालासोपारा पोलीस ठाण्याचे गोपनीय शाखेचे कर्मचारी पोहवा/९६९ ज्ञानेश्वर एकनाथ माचीवाल यांनी दिली असून सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक/संतोष घाडगे हे करीत आहेत.

वरील कामगिरी श्री संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, मिरा भाईंदर वसई विरार आयुक्तालय, परिमंडळ-२, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री चंद्रकांत जाधव, नालासोपारा विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री वसंत लब्दे, नालासोपारा पोलीस ठाणे व नालासोपारा पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner